काव्य
328

शारदाभवन

सुमन

# पुष्प-पराग.

कविः—भास्कर काशीनाथ चंदूरक

क्रा. क्र. १७०१.

( सर्व हक्क स्वाधीन. )

REFBK-0001701
REFBK-0001701

१९१९.

किंमत ५ आणे.

"मराठी-ग्रंथ-संग्रहालय ठाणें"
यांस प्रेमाची भेट म्हणून.
—भा. का. चंदूरकर

# सप्रेम समर्पण.

शिशिरर्तूंतील प्रखर तापानें दग्ध झालेल्या लतेस वसंत नवजीवन देतो. माझी काव्यलता प्रतिकूलपरिस्थितितापानें शुष्क झाली होती, परंतु तिजवर अनुग्रहजलाचें सिंचन झाल्यामुळें ती पल्लवित झाली व फुलांनीं बहरली. ती लता आपल्या पुष्पांतील पराग, आपणांस नवजीवनदात्या वसंताशिवाय—श्रीमंत राजश्री नारायणराव बाबासाहेब चीफ ऑफ इचलकरंजी यांचेशिवाय—कोणास बरें अर्पण करील ?

—वसंतकालीन बालभास्कर.

REFBK-0001701
REFBK-0001701

# थोडी मध्यस्थी.

आज रोजीं रा. भास्करराव चंदूरकर या नूतन कविमित्राची माझ्या महाराष्ट्र रसिक बंधूंना ओळख करून देतांना आणि प्रस्तुत काव्यपुष्पाच्या परागाचें त्यांच्या मनःक्षेत्रावर वर्षण करितांना मला आनंद होत आहे. बालकवि ठोमरे यांची साधीभोळी पण काव्योन्मत्त वाणी कानांत गुणगुणत असतां, आणि गडकऱ्यांच्या अनेक गूढ काव्यांतील रहस्यांचा त्यांच्य तोंडून उलगडा ऐकून हृदय थरारून जात असतां, त्यांच्याविषयीं वाटणाऱ्या आशा, महाराष्ट्र काव्यदेवीच्या वैभववृद्धीविषयीं वाटणाऱ्या उमेदी, आज नष्ट झाल्या आहेत; त्याचप्रमाणें 'सदा तरुण' असे माझे वृद्ध मित्र नारायणराव टिळक यांचीही काव्यमुरली आज भंगून पडली आहे. या आकस्मिक आणि भयंकर धक्क्यांपासून चळलेली वृत्ति अद्याप भानावरही आली नसतां चंदूरकरांची ओळख करून देतांना मला आनंदच होत आहे, यांत विपरीत असें कांहीं नाहीं. ज्या दौलतीचे आपण एकनिष्ठ सेवक म्हणवितों, तिचे कर्ते पुढारी नाहींसे झाले असतां, तिची सेवा करण्यास अननुभवी पण एकनिष्ठ असा कोणी उत्साही तरुण पुढें आला असतां, त्या संकटकालीं थोडासा धीर प्राप्त होणें साहजिकच नाहीं काय ?

रा. चंदूरकर हे गडकरी, ठोमरे किंवा टिळक कोणीही नाहींत. व अशा कोणाशीं स्पर्धा करण्याचीही त्यांची इच्छा नाहीं. ते एक उत्सुक आणि निष्ठावंत असे शारदोपासक आहेत. त्यांनीं स्वतःच्याच घरास शारदाभवन हें नांव दिलें आहे, एवढी त्यांची श्रीशारदेच्या चरणीं निष्ठा आहे. काव्याच्या उज्ज्वल स्वरूपाशीं ते परिचित आहेत. मात्र आपल्या हातून तसली काव्यरचना होते असें त्यांना स्वतःलाही वाटत नाहीं, आणि तसें त्यांनीं प्रस्तावनेंत प्रांजलपणें कबूलही केलें आहे. निरभिमान हा सर्व सद्गुणांचा उगम

आहे. एकदां अभिमानानें ठाणें दिलें म्हणजे प्रगति खुंटलीच. प्रस्तुत काव्यसंग्रहांत शेले, कीट्सच्या मित्रांना फारसें अपूर्व कांहीं आढळणार नाहीं. पण हा प्रथम प्रयत्न आहे या दृष्टीनें पाहिल्यास कवीचें कौतुक करावेंसें पुष्कळांना वाटेल अशी मला आशा आहे. कांहीं प्रकरणांतून कांहीं महाराष्ट्र कवींच्याही कल्पना आढळतील, पण याचें कारण त्या त्या कवींविषयीं वाटणारी निरतिशय श्रद्धाच होय. कवीची वाणी प्रसन्न, अगूढ, आणि अस्खलित आहे. प्रथम प्रयत्न या दृष्टीनें कवीची खरोखरच स्तुति करावीशी वाटते.

वास्तविक पहातां हें मध्यस्थीचें काम माझे मित्र रेव्ह० टिळक करणार होते. पण ते आज या लोकांत नाहींत: माझ्याही हल्लींच्या दीर्घकालीन रुग्ण स्थितींत मजकडून हें काम होण्याचा संभव नव्हता. पण रा. चंदूरकर यांच्या प्रेमळपणानें माझ्या हातांत लेखणी दिली आणि या चार ओळी कशा तरी लिहिल्या गेल्या. माझ्या रसिक महाराष्ट्र मित्रांना माझी विनंति आहे कीं, या नवीन होतकरू कवीच्या कृतीकडे त्यांनीं कृपादृष्टीनें पहावें. कृपेच्या उत्तेजनानें काय होऊं शकणार नाहीं ? आज क्षुद्र वाटणाऱ्या रोपड्यांमधूनच पुढें आकाशभेदी प्रचण्ड वृक्ष निर्माण व्हावयाचा असतो.

मुंबई,
१२।६।१९.

एकनाथ पांडुरंग रेंदाळकर.

# मनांतील गोष्ट!

सध्यां मराठी वाङ्मयाकडे--विशेषतः मराठी काव्याकडे पाहिलें तर लोकाश्रयाभावीं त्यास भोगावी लागत असलेली दीन स्थिति पाहून कोणासही कींव येईल. मराठी काव्याबद्दल—विशेषतः आधुनिक मराठी काव्याबद्दल सुशिक्षितांतही अद्याप अभिरुचि उत्पन्न झाली नाहीं याबद्दल खेद वाटतो. तथापि अलीकडे नवीन पिढींत मराठी काव्याबद्दल बरीच अभिरुचि उत्पन्न होऊं लागली आहे हें त्याच्या उत्कर्षाचें सुचिन्हच होय.

काव्य म्हणजे काय व काव्यापासून मनुष्यजातीला काय फायदे झाले आहेत व होत आहेत याबद्दल पुष्कळ लोक अद्यापही अज्ञानांत व शंकेंत आहेत. काव्य या विषयावर, मराठी भाषेंत, चर्चात्मक वाङ्मय थोडें असलें तरी पाश्चात्य व संस्कृत रसिकांनीं या विषयाचा पुरेसा ऊहापोह केला आहे. वर्डस्वर्थ, कोलरिज् , शेले इत्यादि पाश्चात्य कवींनीं व विश्वनाथ, मम्मट, दण्डी, जगन्नाथ इत्यादि पौर्वात्य कवींनीं, काव्य, काव्याचें स्वरूप, काव्याची आवश्यकता, इत्यादि प्रश्नांवर इतका प्रकाश पाडला आहे कीं त्यांच्या उद्गारांपैकीं प्रत्येकाचे एक दोनच उद्गार देऊं म्हटलें तर एक निराळा ग्रंथच करावा लागेल; म्हणून प्रस्तुत ठिकाणीं सर्वसंमत असे त्यांचे कांहीं विचार देऊन आपणास वरील प्रश्नांचा उलगडा करणें भाग आहे.

काव्य या कल्पनेची व्याख्या पुष्कळ कवींनीं करण्याचा प्रयत्न केला आहे, परंतु आज सर्वसंमत अशी एकही व्याख्या अस्तित्वांत नाहीं. तथापि त्यांच्या व्याख्येवरून काव्याचें स्वरूप सामान्यतः कोणासही कळ-

ण्यास हरकत नाहीं. संस्कृत अलंकारशास्त्रामध्यें हल्लींच्या काव्य या कल्पनेस जुळणारी व्याख्या जगन्नाथ पण्डित याची आहे. ‘ वाक्यं रसात्मकं काव्यम् ’ अशी त्याची व्याख्या आहे व ती वर्डस्वर्थच्या ‘ मनोवृत्तीचा स्वैर उमाळा ’ अशा भावार्थाच्या व्याख्येशीं जुळणारी आहे. शेले हा मानवी प्रज्ञेचे, कल्पना ( Imagination ) व बुद्धि ( Fancy ) असे दोन विभाग करून, काव्य म्हणजे कल्पनेचे खेळ अशी काव्याची व्याख्या करतो. शेलेच्या मतानें गद्य व पद्य लेखक असा जो फरक करण्यांत येतो तो केवळ बाह्य फरक आहे. सृष्टींतील सत्य व सौंदर्य हीं ज्याला पटलीं आहेत, तो लेखक गद्य असो अगर पद्य असो त्याला कवीच म्हटलें पाहिजे. छंदोवृत्तादि सामग्री केवळ भाषेला नटविण्याकरितां आहे, असें त्याचें मत आहे. एखादी कविता वाचणें म्हणजे सनातन तत्त्वाच्या रूपानें जीवनरहस्यच समजावून घेणें होय ( A poem is the very image of life expressed in eternal Truth. ) इतकें तो काव्याला महत्त्व देतो.

काव्याचा उपयोग अथवा आवश्यकता काय ? या प्रश्नाचें उत्तर देतांना काव्याच्या परिशीलनापासून मनावर जो परिणाम होतो त्याकडे लक्ष पुरविणें आवश्यक आहे. काव्याच्या उपयोगाविषयीं मम्मटनें लिहिलें आहे:—

काव्यं यशसेऽर्थकृते व्यवहारविदे शिवेतरक्षतये ।
सद्यःपरनिर्वृतये कान्तासम्मिततयोपदेशयुजे ॥

मम्मटनें सांगितलेले हे अनेक उपयोग थोड्या फार प्रमाणानें आजहि काव्यापासून होत आहेत. काव्यपरिशीलनानें वाटणाऱ्या आल्हादाच्या भरांत काव्याशीं संघटित असलेलें ज्ञान मनुष्य सहजपणें ग्रहण करतो. व काव्यांत सद्गुण, सत्य, नीतिमत्ता यांवरच भर दिला जात असल्यामुळें हीं तत्त्वें समाजाला काय किंवा व्यक्तीला काय कोरडीं सांगण्यापेक्षां, काव्यांत अधिक लवकर पटतात. जगांतील झांकलेल्या सौंदर्यावरील आच्छादन कविता उघडें

 काव्य ५३६

करितें व परिचित वस्तु नव्या काव्यसौंदर्यानें अपरिचितशा वाटूं लागतात. नीतीचें सार म्हणजे प्रीति होय, प्रीति याचा अर्थ स्वत्व विसरून परक्या वस्तूमधील, परक्या व्यक्तीमधील अगर त्या व्यक्तीच्या आचारविचारांतील खऱ्या सौंदर्यतत्त्वाशीं समरस होणें हा होय. हा प्रकार तर काव्याचा प्राण असल्यानें, काव्यामध्यें नीतीचें सारच ग्रथित झालेलें असतें. असो.

अशा प्रकारें काव्याचें उच्च ध्येय व हें स्वरूप जरी येथें दिग्दर्शित केलें आहे तरी हें ध्येय व हें स्वरूप माझ्या हातून थोड्याबहुत प्रमाणानें तरी पार पडलें आहे कीं नाहीं याचा अंदाज स्वतः मलाच करतां येणें शक्य नाहीं, म्हणून हें कार्य वाचकवर्गावर सोंपविणें भाग आहे. प्रस्तुत काव्यसंग्रह हा माझा रसिक वाचकवर्गापुढें येण्याचा प्रथम प्रयत्न असून त्यांतील चुका सहानुभूतीनें दाखवून, या कृतीचें वाचकवर्गानें चोज केल्यास मला आपल्यांतील दोष सुधारून मातृभाषेची सेवा अधिक उत्साहानें करण्यास हुरूप येईल.

श्रीमंत राजश्री नारायणराव बाबासाहेब घोरपडे, चीफ ऑफ इचलकरंजी, यांनीं या पुस्तकछपाईचे कामीं पुष्कळ द्रव्यसाहाय्य केलें याबद्दल श्रीमंतांचे जितके उपकार मानावेत तितके थोडेच आहेत. शिवाय माझे सुशील परम स्नेही श्रीयुत बापूराव रामचंद्र पडळकर, बी. ए., यांनीं माझ्या विनंतीस मान देऊन, आपल्या कांहीं कविता या पुस्तकांत संग्रहीत करण्यास दिल्या, प्रसिद्ध कवि श्रीयुत ए. पां. रेंदाळकर यांनीं माझी महाराष्ट्र रसिक वाचकवर्गाशीं ओळख करून देण्याचे कामीं मध्यस्थीचें काम केलें व "आर्यभूषण प्रेस"च्या चालकांनीं या पुस्तकाची छपाई सुबक व त्वरित करून दिली, याबद्दल या सर्वांचा मी कधीं व कसा उतराई होईन कोण जाणे !

इचलकरंजी
शारदाभवन. १८।६।१९.

भास्कर काशीनाथ चंदूरकर.

# अनुक्रमणिका.

पृष्ठ.

## भास्कर काशीनाथ चंदूरकर.


१ निर्झरास— ... ... ... ... ... १
२ बोध द्या ... ... ... ... ... २
३ नदीतीरावरील प्रातःकाळ ... ... ... ... २
४ भग्नहृदयाचें वात्सल्य ... ... ... ... ३
५ वनज्योत्स्ना ... ... ... ... ... ४
६ निर्माल्य ... ... ... ... ... ४
७ कशानें ? नाकळे !... ... ... ... ... ५
८ प्रबोधन ... ... ... ... ... ६
९ गुलाबास— ... ... ... ... ... ६
१० पूर्णचंद्रावर द्रुतगतीनें सरसावणाऱ्या मेघास— ... ... ७
११ प्रभातसुषमा अहा ! ... ... ... ... ८
१२ कां ? ... ... ... ... ... ९
१३ अधःपात ... ... ... ... ... ९
१४ काल, आज आणि उद्यां. ... ... ... ... ११
१५ मधुर बोल ! ... ... ... ... ... १२
१६ विच्छिन्न कलिका... ... ... ... ... १२
१७ स्थिर न जगीं या मुळिं कांहीं ... ... ... १३
१८ कोण तुझा मी ? ... ... ... ... ... १४
१९ प्रेमशोधन ... ... ... ... ... १५

२० फूल ... ... ... ... ... १६
२१ सुप्तकांतादर्शन ... ... ... ... ... १८
२२ एक स्वप्न ... ... ... ... ... १९
२३ फुलापासून मूल ... ... ... ... ... २२
२४ यौवन आणि प्रीति ... ... ... ... २३
२५ –स ... ... ... ... ... ... ... ... २४

**बापूराव रामचंद्र पडळकर, बी. ए.**

१ दयिता रुसली कविता मुकली० ... ... ... २६
२ मूर्तिमंत सौंदर्य. ... ... ... ... ... २७
३ मुरलीची विश्रांति ! ... ... ... ... २८
४ शांति ... ... ... ... ... २९
५ काळाचे खेळ ! ... ... ... ... ... ३०

# पुष्प-पराग.

## १ निर्झरास–

**चाल**—प्रेमा ऊठ, चल.

डुलवीं रान ॥ निर्झरा ! करुनि तूं गान ॥ ध्रु० ॥
        कल्‌ कल्‌ कल्‌ कल्‌ गान तुझें तें
        ऐकुनि लहरी मोदें डुलते
        तालीं नाचत पुढती जाते
होइ विलीन ॥ त्वद्रूप पावली जाण ॥ १ ॥
        वायू वाहे गंधें भरुनी
        पराग उडती कुसुमांवरुनी
        स्वागत करिती आनंदूनी
जणूं तव बाळा ॥ निर्झरा ! गाइं वेल्हाळा ! ॥ २ ॥
        या कलिका मग डुलतिल मोदें
        नाचनाचतिल गानानंदें
        करतिल हर्षुनि गीत-निनादें
सुधावर्षाव ॥ द्वैताचा सांडुनि भाव ॥ ३ ॥
        भानुकिरण बघ तुज कुरवाळी
        कनकरसानें अवनी न्हाली
        परिधानूनी ही हिरवाळी
उत्कंठेनें ॥ झेलते तुला मोदानें ॥ ४ ॥
        गा गा निर्भय असा निर्झरा,
        भूतल जागा कर तूं सारा
        नैराश्याचा मोड मनोरा
असें संगीत ॥ अविरत गा या रानांत ! ॥ ५ ॥

दा. क्र. १८७०१

## २ " बोध घ्या ".

**चाल**—आनंदी आनंद गडे०

इंदु उगवला गगनांत ॥ कलिका फुलल्या बागेंत
स्मित करिती किति गालांत ॥ वायूसंगें केलिरत !
परिमल त्यांचा ॥ जन-प्रेमाचा
हरवी साचा—
खिन्न मनींचा श्रम सारा ॥ परिमलमंडित हा वारा ! ॥ १ ॥
शशिकिरणांनीं ही अवनी ॥ धवलवसन हें नेसूनी
दिव्यतारका-हारांनीं । नटली वाटे हर्षानी
अवनी ऐशी ॥ सजली खाशी
पाहुनि तिजशीं
मोद होतसे मम चित्तीं ॥ बोध घेइं मी अल्पमती ! ॥ २ ॥
" मधुपरिमळशी तव कीर्ती ॥ पसरावी अनुदिन जगतीं "
हें मज सुमनें सांगितलें ॥ उद्यानेंही निवेदिलें
" मजला पाहुनि ॥ जैसा गुंगुनि
जाशी तूं मनिं
सकलां मजसें रमवावें ॥ चांदणिसाचें चमकावें ! " ॥ ३ ॥

---

## ३ नदीतीरावरील प्रातःकाळ.

**चाल**—चंद्रकांत राजाची०

बालरवीचा उदय जाहला, कोमलकिरणांचें
जाल पसरलें, जणों उधळिलें पाणी सोन्याचें ! ॥ १ ॥
फुलें विकसलीं, रंगें खुललीं, तरुराजी डुलली
मधुमंदानिल वाहुनि त्यांना कुरवाळुनि झेली ! ॥ २ ॥
द्विजगण हर्षें करिती किलबिल मंजुल प्रेमानें
शिशुंना घेउनि पडती बाहिर उडती नेटानें ॥ ३ ॥

काव्य २३५

प्रशांतसमयीं ऐशा, वाहाति सारिता स्वच्छंदें
द्विजगण संध्यावंदन करुनी रविला अर्घ्यें दे ॥ ४ ॥
सरितेच्या या तीरा पाहुनि मोद मना वाटे.
करितों गंगे ! प्रणति तव पदें जग भासे खोटें ॥ ५ ॥

---

## ४ भग्न हृदयाचें वात्सल्य !

[ एका असहाय गरीब विधवेची मुलगी आपल्या बरोबरीच्या श्रीमंत मुलींनीं सोन्यामोत्यांचे दागिने घातलेले पाहून " आई मला तसले दागिने दे ग. " म्हणून रुसली आहे. ]

**चाल**—अजि शेवटचा लाभ.

प्रिय कन्येचे बोल बोबडे श्रवुनी ॥ जल भरलें मातानयनीं
बहु वात्सल्यें प्रेमानें बघणारें ॥ क्षणिं तें मुख सुकलें हंसरें
हृत् कालवलें कंठ दाटुनी आला ॥ वदवेना शब्दहि तिजला
गत काल गमे सोन्याचा
प्रिय पतीसवें हंसण्याचा
संप्रतिचा—हाय ! ........
तिज देहाची शुद्धी लवहि न उरली ॥ अंधारी नयना आली ॥ १ ॥
मग कन्येला प्रेमें चुंबुनि माता ॥ म्हणते " तुज देइन बरं का ? "
( नच खर्चाया एक रुकाही हातीं ॥ मग कुठलें माणिक मोतीं ? )
" बहु सजविल जो वस्त्रालंकारांनीं ॥ तो पति मी देइन करुनी
" मग दिसुनी गोजिरवाणी
" राजाची गमाशिल राणी !
" तुज देइन ऐशा स्थानीं
" मग झालें ना ? खेळाया जा आतां " ॥ आनंदें गेली दुहिता. ॥२॥

---

## ५ वनज्योत्स्ना.

### श्लोक.

क्षितितलीं वितरीं शशि चंद्रिका
हंसुनि विभ्रम दाविति तारका
मन सखीविरहें झुरुनी, तया
उपवनीं बसलों रमवावया. १
पवनगंध सुटे अह ! सौख्यद
डुलति अंबुजिनी सरिं शर्मद !
करि मुदें किमया शशि तो निका
म्हणुनि कामिनि ह्या हंसताति का ? २
कुसुमिता लतिका नवयौवना
क्षितितलीं करिती सुमसिंचना !
तरुहृदीं रमुनी डुलती किती
प्रणयकालिं नुरे दुसरी स्मृति ३
पतिसवें युवती रहसीं जशा
हंसति खेळति होउनिया पिशा !
गमति तत्सम या कलिका वनीं
पवनसंगमिं खेळति हर्षुनी. ४
बहरुनी वनिं माधव शोभला
रिझवि सुस्वनिं गाउनि कोकिला
ममहि अंतर पुष्पित होउनी
सुखवि एक तिथें पिक सुस्वनीं ! ५

---

## ६ निर्माल्य.

### श्लोक.

ज्या पुष्पां बघुनी मनोज्ञ, कुतुकें आनंदली मन्मती
कोण्या दुष्ट करां पडूनि बालि त्यां म्लानत्व ये संप्रती

गेलें मार्दव, गंधही सकल तो संपूर्ण गेला लया
त्याचा प्राणसखा असा भ्रमरही आतां बघेना तया ! १
या विस्तीर्ण अतीव काल तरुचीं आम्ही फुलें मानव
मोदें हांसति, डोलती कितितरी आल्हाददायी नव
मृत्यु क्रूर करील हाय ! अमुच्या विच्छेदना जेधवां
या पुष्पांसम शुष्क होउनि पडूं धूलीमधें तेधवां. २

---

## ७ " कशानें ? नाकळे. "

**चाल**—भला जन्म हा तुला.

दिनभरि जीवनकलह करुनि मी शांत कराया मन
पहुडलों सौधावरती क्षण
प्रशांत रजनी ! फुल्ल चंद्रमा अवनी सुंदर दिसे
परि मला जाणिव त्याची नसे;
नीलाऽकाशीं चारु तारका तेजस्वी चमकती,
परि मला खडेच ते भासती !
किंचिन्मुकुलित गुलाबकलिका होत्या जरि मत्करीं
होइना मोद परी अंतरीं
श्री–' केशवसुत ' ' गोविंदाग्रज ' ' टिळक ' कवींच्या कृती
वाचिल्या; न रमे परि मन्मती
कविता मनमोहिका अळवितां प्रसन्न ती होइना
शांत लव मानसही राहिना
परि सुधास्यंदिनी सुमूर्त कविताप्रिया-
कर स्कंधीं अवचित पडतां अह ! लीलया
खिन्नता मनींची गेली सगळी लया
क्षणापूर्वींचें अस्थिर मन तें मुदित अतां जाहलें
कशानें ? माझें मज नाकळे ! १

---

## ८ प्रबोधन !

**चाल**—माधवा जिवलगा तूंच विसावा जीवा.

सुंदरी ! ऊठ गे पहा उषा ही आली
ते उडुगण, शीत ज्योत्स्ना लोपुनि गेली ॥ ध्रु० ॥
विकसल्या फुलांचा पवनगंध हा वाहे
बघ विहंगमस्वन कोंडुनि भुवनीं राहे
मृदु गुलाबकलिका हंसती नव उद्यानीं
तरु मुदें डोलती, नाचति लतिकारमणी
रविकिरण—कनकवृष्टी ही भूवरी
दंवमौक्तिकसिंचन झालें बहुपरी
शिशुनिर्झर झुळझुळ वाहे कंदरीं
वनिं उद्यानीं नव सुमनवृष्टि ही झाली,
रमणीय समयिं ह्या सुप्ति कशी तुज आली ? ॥ १ ॥

---

## ९ गुलाबास.-*

**चाल**—अंबरगत परि पयोधरातें०.

माझी अणखी अपुली वेळा व्यर्थ दवडिते तिला
सांग जा सुमना तूं कोमला
कीं "मी तुजशीं तिज तुलतांना किती मधुर सुंदर
दिसत ती कळेल तिज सत्वर
तरुण असूनी जी बहु अपुलें अनुपम सौंदर्य तें
जनांनीं बघण्याचें टाळितें
तिला सांग कीं ओसाडिंत मी विकसित झालों तर
कोणि ना पुसतिल नारी नर.

---

* ई. वालर कवीच्या " टु रोज " या कवितेच्या आधारें.

जें यौवन असतें दूर जगापासुनी
त्या सौंदर्याचें मोल न कांहीं जनीं
म्हणुनी सुमना ! तिला सांग जा जगापुढें यावया
वानिलें तारे ना लाजावया " ॥ १ ॥
मग तूं मर; तूं मरतां तुझियाठायीं ती पाहिल–
वस्तु जी सुंदर ती चंचल
कसल्या दुर्दैवांतुनि सुंदर रम्याद्भुत वस्तुला
लागतें यावें, कळुं दे तिला
ज्या वस्तू सुंदर, मधुर तयांच्या करीं
कालाचा येतो अल्प भाग कितितरी ?
म्हणुनि गुलाबा ! तिला सांग कीं "कीर्तिहीन राहणें
सम तें असलें नसलें जिणें !" ॥ २ ॥

---

## १० पूर्ण चंद्रावर द्रुतगतीनें सरसावणाऱ्या मेघास–

**चाल**–फटक्याची.

आवरिं आवरिं द्रुतगति अपुली झडकरि आवरिं कृष्णघना !
व्यापुनि टाकिं न तारानाथा हीच विनंती तव चरणा ॥ १ ॥
कीं त्यायोगें सकल मेदिनी घनांधकारें व्यापेल
फुलतीं पुष्पें तशींच राहुनि नलिनी दुःखें रडतील ! ॥ २ ॥
प्रियप्रणयिनी गाढालिंगनिं सुखगेहीं रत किति असती
दचकुनि अंतरिं दूषितील तुज आठव याचा करिं चित्तीं ॥ ३ ॥
चकोर शीत ज्योत्स्नासौख्यीं गेले असतिल जे रमुनी
ते तवयोगें स्तिमित होउनी होतिल बहुपरि खिन्न मनीं ॥ ४ ॥
निर्झर सरिता प्रमोददायक गीतें मंजुळ जीं गाती
तीं गीतें तव योगें कर्कश होउनि कानांवरि येती ॥ ५ ॥

विरही कांता वल्लभचिंतनिं मग्न कुणी ज्या असतील
तद्हृदयीं तवयोगें अधिकाचि कृष्ण निराशा पसरेल ! ॥ ६ ॥
घूकगणांच्या घूत्कारानें स्थिरता राहिल नच भुवनीं
म्हणुनी मेघा ! तुला सांगतों फिर माघारी फीर झणीं ॥ ७ ॥

---

## ११ प्रभातसुषमा अहा ! सुखविते मनाला किती.

**पृथ्वी.**

विनाश तम पावुनी नभ दिसे निळें निर्मळ
वनीं सुखद विंझणा पवन वारितो शीतळ !
विहंगगण मंजुळ स्वन मुखें मुदें काढितां
प्रभातसुषमा अहा ! सुखविते मनाला किती ॥ १ ॥
वसंतनवपल्लवोद्गमलता बहू सुंदर
किती चढति पुष्पिता टवटवीत वृक्षांवर
सुरम्य परिरंभणीं जणुं सखासखी दंग तीं
प्रभातसुषमा अहा ! सुखविते मनाला किती ॥ २ ॥
सुवर्ण रवि पाहुनी बिकच जाहल्या पद्मिनी
पतीस बघुनी जशी मधुर हांसते मानिनी !
तयास रिझवावया विमलशा सरीं डोलती
प्रभातसषमा अहा ! सुखविते मनाला किती ॥ ३ ॥
पडूनि दंव भूतलीं सकल सस्यपुष्पांवरी
मनोज्ञ रविकांतिनें गमत गोल मोत्यांपरी !
किती विलसती किती चमकुनी लया पावती
प्रभातसुषमा अहा ! सुखविते मनाला किती ॥ ४ ॥
विकास नव पावलीं उपवनीं फुलें सुंदर !
कितीक पवनासवें करिति खेळ चेतोहर

मरंद मधु सेवण्या भ्रमर त्यांवरी गुंगती
प्रभातसुषमा अहा सुखविते मनाला किती ॥ ५ ॥

---

## १२ " कां ? "

**चाल**—वसंतीं बघुनि मेनकेला०

हिमकरा नभिं देखुनि नयनीं
मुग्धेसम कां मधुर स्मित करि ही ललिता नलिनी ? १
तरणिकर नभिं सुंदर पसरे
परि त्याआधीं कां दिसतें मुख पूर्वेचें हंसरें ? २
कृष्णनिशिं जीं बहु रुसलेलीं
तीं सुमनें रवि उदयाचलिं कां येतांना हंसलीं ? ३
उपवनीं गोड फुलें हंसतां
तद्गंधानें धावुनि येई मधुकर कां भंवता ? ४
ज्यानें वंशहि विंधावा
तोच मधुव्रत कमलकोशिं कां गुंतुनियां जावा ? ५
दुःखित जननीला बघुनी
घळघळ येई बाळांच्या कां नयनीं बहु पाणी ? ६
संमुख पाहुनि प्रियपतिला
चिरविरहातुररमणीहृदयीं हलतो कां झोला ? ७
विषमय कांटेरें जग हें
नंदनवनसम कविहृदयाला कां भासत आहे ? ८

---

## १३ अधःपात !

**चाल**—चंद्रकांत राजाची कन्या०

प्राङ्देवीचा प्रणय भंगुनी जाइ अशीतरुचि*

---

* सूर्याचे किरण।

प्रेम नराचें अढळ न, केवळ त्याची भिन्न रुची. १
सस्मितवदना सखी आपुली वाट बघत दारीं
लेउनि सुंदर दिव्य गुलाबी शालू जरतारी, २
पाहुनि ऐसें रवी निघाला, किरण पुढें आले
उषा-रवीचें अन्योन्याकारें मधुमीलन झालें ! ३
वनदेवीनें फुलें उधळिलीं तइं त्यांच्या वरुनी
नाचुनि दमली मृदुलनिनादी निर्झर निर्झरिणी ! ४
प्रेममूर्ति—सखि—सहवासीं रवि बहुत वेळ रमला
जिकडे तिकडे प्रेम ! प्रेम ! प्रेमांतचि विरला ! ५
पुढें उतरली प्रेमसमाधी प्रेमखुळ्या रविची !
जाणिव जागृत मानसिं झाली निजकर्तव्याची ! ६
" उषे ! देवते ! सोड सोड मज जाऊं दे आतां
" खुळे ! किती बघ वेळ जाहला तुजपाशीं रमतां " ७
अंबरमार्गें रवी निघाला तिज ऐसें म्हणुनी
हंसावित सुमनें हंसावित जगती अपुल्या किरणांनीं ! ८
नभःपथावरि बहुत चालुनी येतां रवि वळुनी
मागें निरखी सहज कटाक्षें अपुली मनरमणी ! ९
तों त्या दिसली उषा हतप्रभ—नव्हती ती सुभगा
प्रियपतिविरहें व्याकुल होइ न कोण सती सांगा ? १०
प्रथमसंगमीं जैशी दिसली उषा तशी नाहीं—
सुहास्यवदना, मुग्ध, मनोहर, वाटे नवलाई ! ११
परी पश्चिमा तयास दिसली खुणावीत आहे
अनुरक्ता ती आपण होउनि भेटाया पाहे ! १२
किती लाजुनी किती मुरडुनी विभ्रम किति दावी
परि ही जादू लवही आतां उषेजवळ नाहीं ! १३
अवहेलन त्या करुनि उषेचें झिडकारुनि तिजला
तो पापात्मा रक्त—पश्चिमेठायीं मग रमला ! १४

रवे ! रवे ! हें काय करिशि तूं स्वस्त्रीला त्यजुनी
अंगिकारिसी बाजारांतिल नव चंचल तरुणी ! १५
उषा निमाली विरहें, देवासदनीं ती गेली
पतिविरहानें तारारूपें दुःखाश्रू ढाळी ! १६
हाय ! हाय ! ! तों पतन जाहलें तेजस्वी रविचें !
योग्य मिळालें फळ त्या नीचा विषयवासनेचें ! १७
रवी निमाला तरी प्रतीची क्षण हांसत होती
प्रेमाविण ना कोणी ढाळी विरहें अश्रुतती ! १८
अढळ पतीवरि सतीप्रेम, ती मूर्ति प्रेमाची
प्रेम नराचें अढळ न, केवळ त्याची भिन्न रुची ! १९

---

## १४ " काल, आज आणि उद्यां. "

### श्लोक.

जें कांहीं सुखदुःख " काल " मनुजा ! होतें तुला वाटत
आहे काय तसेंच वाटत तुला "आजी ?" कधीं मत्प्रत;
नाहींना ? स्थिति काल जी स्थिर "अजी" ती राहिली अल्प ना.
"उद्यां"ला "अज"ची टिकेल स्थिति का ? याची करी कल्पना १
होतीं शोभत " काल " जीं वनिं फुलें कोमेजलीं " आज " तीं
गेला भंगुनिया गिरी चुरडला कालें पहा संप्रती !
हें सारें जग, चंद्रसूर्यहि तसे ह्या तारका नश्वर
कैसा शाश्वत सांग हा कुहरिसा अत्यल्पजीवी नर ? २
होता " काल " जसा तुझ्या करिं तसा आहे पहा "आज" हा
याला शुद्धमनेंकरूनि जगदीशाच्या पदातें वहा
कां कीं भंगुर जीव जाण अपुला, नाहीं भरोंसा क्षण
"उद्यां" केवळ भास होय म्हणुनी त्याची धरीं आस न. ३

---

१ दंवबिंदु.

## १५ " मधुर बोल ! "

**साक्या.**

अननुभूत माधुरी सेवुनी मित्रा ! तव हलव्याची
तोष अतुल मनिं तैशी झाली स्फूर्ती मज गानाची ॥ १ ॥
चिरप्रणयसद्भावें सादर कथिलें मजशीं बहुत
भावपूर्ण तें वर्णवे न मज गातां रमतें चित्त ! ॥ २ ॥
"मधुर बोल" ऐसें तूं मजला सांगितलें प्रेमानें
कृत्रिमतेनें नच, विमलोज्ज्वल प्रेमें माधुर्यानें ॥ ३ ॥
मधुरवचानें मैत्री जमते टिकते मधुर वचानें
मधुरवचानें रागहि जाई, वश हो थोरहि त्यानें ॥ ४ ॥
जिंकावें मधुशब्दें पतिचें प्रेम प्रेमी स्त्रीनें
माधुर्याचा विपाक वदती प्रेमचि उच्च रवानें ॥ ५ ॥
शत्रू होती मित्र भाषणें मधुर, वश्य कीं होतो
प्रेमें देवहि, दुर्लभ इतरां कठिण मार्ग जो गमतो ॥ ६ ॥
ऐसें आहे महत्त्व मोठें मधुरवाणिचें जगतीं
परमार्थाचा सुपथ अन्य नच, करितों तींतच वसती ॥ ६ ॥

---

## १६ विच्छिन्न कलिका !

( चालः— चंद्रकांत राजाची कन्या० )

कुणि दुष्टानें निर्दयतेनें कलिका ही खुडली,
हिज खुडतांना तद्धृदयाला दया न कां आली ? १
वनदेवीच्या अंकावरचें गोंडस हें छकुलें
स्वैरपणानें खेळत असतां कोणीं कुस्करिलें ! २
उषःकालिं ज्या कोमल सुंदर फुललेल्या दिसल्या
त्याच पाकळ्या विशीर्ण होउनि भूमीवर पडल्या ! ३
कलिके ! तव हीं दलें न माझें छिन्न हृदय झालें
तुझ्या अभावीं नीरस वाटे उपवन हें सगळें ! ४

आनंदाच्या उच्चनगावरि असतांना तुजला
कालमुखीं लोटुनी स्वाविक्रम कोणीं दाखविला ?
माझें मन मज मुकलें परि मी जिवंत ह्या भुवनीं
तूं मेलेली देहें जगिं, परि जिवंत सुरसदनीं
आपण दोघी समानदुःखी करूं अश्रुपात !
कंठ आपुले परस्परांच्या घालुनि कंठांत !
सत्प्रेमाचीं आम्ही गाऊं मोदानें गाणीं
दिव्यप्रीती देव न ऐसें कोण सांग वानी ?
तूं मजला प्रिय म्हणुनी अवघड वाटे या कालीं
प्रेमहीन जीं हृदयें तीं जगिं सम असलीं नसलीं !

---

## १७ " स्थिर न जगीं या मुळिं कांहीं. "

( चाल—आनंदी आनंद गडे० )

प्रमुग्ध कलिका उद्यानीं पाहियली मीं एक दिनीं.
मंदसमीरांदोलांत होती झोके बहु घेत.
गंधित सोडित निःश्वसितें भुलवाया निज रमणातें !
मृदुला विमला कलिका ती स्वैरपणें डोलत होती !

पाहुनि तिजला
शीण हरपला
मोद जाहला

विचार आला मनीं तदा राहिल का ही अशी सदा ?
मानिनि अणखी मी मिळुनी प्रभातसमयीं येवोनी
गाऊं येथें मधुगीतें रिझवाया फुलराणीतें !
चुंबाया तैं निजरमणी येइल मधुकर धावोनी
मधु-मीलन तें पहावया अर्धांगिं वळतां मम भार्या

मागुनि जाउनि
हनू धरूनी
चुंबचुंबुनी
लज्जावतिच्या मृदु गालीं कलिका पाहिन मी हंसली ! २
विचार ऐसा जो आला क्षणिं तो गेला विलयाला
पुढती दिसला नयनांना अस्ताला रवि जातांना !
निशिं हिमकर नभिं येईल रविसम अस्ता जाईल
स्थिर नच पर्वत ग्रहतारा स्थिर न सृष्टिचा डोलारा !
मग ही कलिका
मनोमोहिका
राहिल अशि कां ?
व्यर्थ व्यर्थ मम आशा ही स्थिर न जगीं या मुळिं कांहीं ! ३

---

## १८ " कोण तुझा मी ? "

( चाल—अंबरगत परि पयोधरातें० )

कोण तुझा मी ? म्हणुनि वाहण्या मज ही पुष्पावली
सुंदरी ! सांग ? सांग ? गुंफिली.
दिनभर बहुपरि कष्ट सोसुनी शिणशी भवसागरीं
नेणशी तहानभुक अंतरीं
गोड गोड पक्वान्नें करुनी मला वाढिसी मुदें
वाटते तुच्छ सुधा त्यांपुढें !
वडिल जनांची सेवा करण्या शिशुपालनपोषणीं
राहसी तत्पर रात्रंदिनीं !
करुनि सडासंमार्जन गृह तें स्वच्छ किती ठेविसी
अम्हांस्तव जलकुंभा वाहसी

यापरी सोसशी कष्टां नानापरी
भव सुलभ हाकेशी महारथी तूं खरी
उत्तेजित करिशी मधुर वदुनि वैखरी
दुःखनिराशाघनतिमिरीं मज आस दीप दाविशी
सृष्टि ही भासविशी स्वर्गशी ! ॥ १ ॥
या कष्टां जणुं सौख्यच मानुनि शीत सुधा वर्षित
तव मुख दिसतें मंदस्मित !
या कष्टाचा, प्रेमाचा उतराई होऊं कसा ?
सखे ! मी मंदभाग्य हा असा !
तुज सुखवाया मजजवळीं ना माणिमौक्तिककांचन.
वस्त्रही धड घेण्या शक्ति न.
वेडा मी मानिनी स्वग्य तव प्रेम हीन समजुनी
तोलतों त्याला संपत्तिंनीं !
तूं भारतमाहिलाललाम महिला खरी
विहरसी देवता मूर्तिमंत भूवरी
ह्या बुडत्या राष्ट्रा काढायातें वरी
जसम सुशिला, देशोद्धारक पतिला साह्यास्तव
पाहिजे तत्पर दिनिं नवनव !

*
* *

तूं उद्योगी मी अळशी. मज नलगे पुष्पावली
पात्र तूं तीतें, मी नच मुळीं !

---

## १९ प्रेमशोधन

**चाल**—किती रहावें तुजविण०

मूर्त प्रेमा ! कुठें राहसी कधीं सुखविशी भेटूनी ?
शिणलें भ्रमलें मम वेडें मन निशिदिनिं तुजला शोधूनी !

वणवण फिरुनी माळावरती वेड्यासम मी बहूपरी
गिरिशिखरें लंघुनी शोधिल्या मोठ्या भयकर निळ्या दरी !
परि न कुठें भेटसी मला
ध्यास मन्मनीं तव सगळा
बनें पूर्ण मी खुळा खुळा !
सुप्तिदेविची कृपा भाकिली तीहि परी मज अवमानी
शिणलें भ्रमलें मम वेडें मन निशिदिनिं तुजला शोधूनी ॥ १ ॥
कुसुमोद्यानीं लतामंडपीं सरिंही तैसें नलिनींत
धुंडियलें परि तुझ्या अभावीं बनें पूर्ण मी हतचित्त !
मनःशांतता मज मुकली
मनिंची तळमळ दुणावली
जीवजडत्वें तनु शिणली
बा प्रेमा ! मज तुझ्या अभावीं व्यर्थचि वाटे जगिं जगुनी
शिणलें भ्रमलें मम वेडें मन निशिदिनिं तुजला शोधूनी ॥ २ ॥

---

## २० फूल.

### अंजनीगति.

दंग होउनी काव्यचिंतनीं
गेलों विहरत रम्योद्यानीं
अनुपम सुषमा वनदेवींची
पाहियली नयनीं

अहह ! काय तीं सुंदर कुसुमें
करीत विभ्रम संध्यावातें
मधुरस्मित मुखिं करुनि लाजती
अन्योन्यां प्रेमें.

विकचकुसुममृदुदलांवरूनी
पराग गंधित उडती पवनीं
मजला वाटे नंदनवन कीं
आलें हें भुवनीं !

वृत्तिलता मम पुष्पित झाली
हृदयसागरा भरती आली
हुंगाया मीं गुलाबतरुची
खुडली पुष्पकळी ४

गृहलक्ष्मी मग धांवत आली
वृत्ति तियेची प्रेमें खुलली
गुलाबकाळि मम पाहुनि कारें, तिची
मुखनलिनी सुकली ५

"कांते ! दयिते ! काय जाहलें ?
सखये ! कां गे मौना धरिलें ?
स्मित वदनींचें क्षणापूर्विंचें
विलया कां गेलें ? ६

"हंसरी कलिका कां गे ! सुकली ?
चंद्रकला कां लोपुनि गेली ?
क्षणभर सौदामनी चमकुनी
विलुप्त कां झाली ? ७

"हांस हांस गे हांस कामिनी
मधुर बोलुनी पाड मोहिनी
प्रेमवीक्षणें सुधावृष्टि करिं
मम गात्रांवरुनी." ८

खिन्न मनानें कांता बोले–
" फूल पुरें जें नाहीं हंसलें
तरुवरि डोलत असतां त्याला
तुम्हीं कां खुडलें ? ९

"सौरभ मधु निज नाहिं विखरला
मधुमकरंदहि नाहिं सांचला

गुंजारव मधुपाचा ज्यानें
अजुनी नायकिला १०

"निर्झरगान न पुरें ऐकिलें
ना दिनकरकरजाल पाहिलें
कोमलतेची मूर्ति असें तें
प्रसून कां खुडलें ?" ११

असें बोलुनी कंठ दाटला
मृत तनयांचा आठव झाला
त्या कलिकेवरि तिनें अश्रुंचा
अभिषेकचि केला ! १२

---

## २१ सुप्तकांतादर्शन.

**चाल**—बोल बोल पांखरा.

सुखद शयनिं पहुडली
प्रिया मधुर झोंपली
मुखेंदुकांति पसरली
प्रणयमूर्ति भासली ! १

वामहास्तिं मस्तकास—
ठेविलें; मुखीं सुहास
वाहि मंद श्वास गंध
सुमनमाळ चुरडली ! २

कुरल केश विखुरले
कपोल लाल जाहले
स्वेदबिंदु शोभले
दंवबिंदूसे कमलीं ! ३

सुदति ! हृदयसाक्षिणी !
सखी ! सदनशोभिनी !
सुप्त तुजशि पाहुनी
मति मदीय मोहिली !
तुला हृदयशारदे !
ठेवितों हृदीं मुदें
स्थीर राहुनी तिथें
स्वर्ग आण भूतलीं !

---

## २२ एक स्वप्न !

सुखद समय वासंतिक आला
सकल जनांतें मोद जाहला
रमणीयत्वहि येई काला
घटकेसम दिन वाटे मजला; सर्वचि आनंद ! !
रजनी तर अतितर रमणीया
कविला येई स्फूर्ति गावया
मनस्थ दुःखद विचार जाया,
तसा मनातें शांति द्यावया, सिद्ध वसंत गमे.
प्रभात-कालीं मंद मारुत
आम्र-मंजिरी-स्थित सौगंधित
गंध लुटुनि उन्मादें पळत-
सुहृदाला जो तोषवि बहुत; निद्रोत्तेजक हो !
झोंप गुलाबी कवटाळीते
सत्य युवतिसम आलिंगीते
कुठेंहि मन चंचल ना होतें
पूर्णाचि तंद्रा लागुनि जाते निद्रेमधिं साच

ऐशा निद्रेमाजी गुंग
झालों कमलीं जैसा भृंग
स्वप्नीं तैं ज्या झालों दंग
कथितों रसिकांसी तें सांग कौतुकमय साचें
प्रचंड नौकेमाजीं बसलों
भव्य वारिधीमध्यें शिरलों
सागर-सौंदर्यानें धालों
धवला द्युतिनें दिपुनी गेलों; मोदें भरलों मी.
प्रचंड तेव्हां लाटा उठती !
वा युवती या लास्या करिती !
स्वच्छंदें जणुं पाठचि शिवती !
वा तीरालिंगनार्थ जाती तूर्ण गतीनें या !!
हृदर्णवाही येई भरती
लाटा मोदाच्या खळबळती
कारण शशिचीं बिंबें घेती-
आंदोलन; नृत्यातें करिती, स्वच्छंदें तेव्हां !
तोंच समीरण चंचल वाहे-
जोरानें; हाले नौका हे
हिम-नग-शिखरीं साम्यचि आहे-
ऐशा लाटा उठती पाहे-चुंबाया चंद्रा !
प्रकृतिदेविच्या सौंदर्यांत
गेलें होतें गुंतुनि चित्त
वृत्ति तदा मम तन्मय होत
परि ईशाला कां नच सहत तल्लीला—ध्यान ?
हाय !— उलटली नौका साच !
पार पळाला धीर तसाच !

परि डुलती या ऊर्मि पहाच
आनंदानें युक्तचि साच, विषम जगीं रीती !
एक हांसतो, दुसरा रडतो
एक सौख्य-भोगासि भोगितो
दुसरा भिक्षा मागत फिरतो
एक उपजतो, दुसरा मरतो, विषम जगीं रीती !
उच्चतमोर्मि क्षणांत नेती–
मातें उच्चीं; दोलन घेती
भेटायातें नभास जाती
क्षणांत पाताळांत उतरती; कृतांत जवळी ये !
‘ बुडत्या काडीचा आधार ’
वचन गमे मज नच साधार
नैराश्यीं पडलों साचार
दैव करी मम बहुतचि चार; सन्मुख मृत्यूच्या !
गटंगळ्या खाउनि बेजार
गेला उडुनी मनिंचा धीर
जात चालली शुद्धहि पार
अनंतांत त्या लीन अपार जंव व्हाया लागे–
तोंच नभांतुनि तेजःपूर्ण
मूर्ती खालीं उतरे तूर्ण
दिसे वदनिं त्या कृपाच पूर्ण
हात आपुला सहसा देउन तीरा मज लावी !
भरुनी आला कंठ तेधवां
वंदुं कसा तिज कळे न जीवा !
देहिं विरुनि तैं अन्य न भावा–
थारा उरला; पूर्ण विसांवा लाभे त्या ठायीं !

ग्रं. क्र. ... ग्रंथालय

लौकिक वंदन कुठलें मग तें ?
साधन भावा दाविण्या रितें
अस्तित्वाचि जैं वंदनमय तें
अन्य साधना कोण धुंडितें मूर्खपणें तेव्हां ?
शब्द निघाले मग हृदयांतुनि
'देवि, कोण तूं ? दासालागुनि–
'कधीं कृपेला पूर्ण करोनी
'तुझ्या दयेला पात्र कशानें झालों मी सांग ?'
'आशेची मी वडील बहिण'
वदे मजाशि ती संतोषून
'वदती मज 'कविता' ऐसे जन
भजासि कधिं कधीं मजला म्हणुन साह्य तुला केलें !'
ऐसें वदतां क्षणैक तीनें
मजाशि देखिलें दिव्य दृष्टिनें
देहभान मम गळलें तेणें ! !
दुज्या क्षणीं जों पाहे नेत्रीं अंतर्हित झाली ! ! !

---

## २३ फुलापासून मूल ! !

### दिंडी.

मुदें तरुणीनें उपवनांत वेली
स्वजीवासम मानुनी लावियेली
स्वयें प्रेमें वाहुनी कुक्षिं पाणी
यथाकालीं ती घालते जपूनी १
अशा रमणीच्या सुधामय–करानें
प्राप्त–जीवन नवलता ती भरानें
शुक्र पक्षींच्या इंदुसम सुतेजें–

क्रमें वाढे; त्या उपवनांत साजे
जधीं 'वासंतिक समय' रम्य येत
कोकिलादिक सुस्वरें मञ्जु गात
वृक्ष पल्लव–नव–वस्त्र पांघरीतो
लतालिंगन बहु मुदें स्वीकरीतो
प्रेम–मीलन–फल सुरभि–कुसुम मूल–
तदा लतिकेचें, पाडि मना भूल
रुचिर ललनेअंतरीं प्रेम येई
लता-बालक निज करीं हळू घेई. ४
गोड चुंबन ती तदा घेइ त्याचें
प्रेम-पूरित मन होतसे तियेचें
कौतुकानें घेवोनिया तयास
अर्पि बाला बहु मुदें स्वप्रियास ५

*　　*　　*

तसा आला रमणिचाही वसंत !
किती प्रेमाला हृदीं पूर येत !
प्रेम–पूर्णा ही सृष्टि तदा होई
स्वनाथातें आलिंगनास देई ६
सुमप्रेमा पाहुनी विपिन-देवी
तोषुनी तिज सुकुमार बाळ देई
करीं घेई त्या चुंबिते तशीच
अर्पि नाथा; आनंदपूर्ण साच ७

---

## २४. यौवन आणि प्रीति.

### साकी.

रम्य कपोलीं छटा गुलाबी विद्रुमसम ते अधर
नयन विलोलहि, सुहास्यवदना, वचन असे बहु मधुर १

कुंतल कुरळे स्वर्णकेतकीसमान रम्या तनु ते
नितंब पृथु, पीनत्व पावले तैसे वक्षोजहि ते २
परंतु यौवन सरतां होतिल गाल वळ्यांनीं युक्त
अधरीं काळिमा येइल होतिल तैसे निष्प्रभ नेत्र ३
तनु, कुंतल, मुख या सगळ्यांची जाइल विलया सुषमा
ऐशि यौवनावरची प्रीती येइल कैशी कामा ? ४
भामानयनमनोहर बाह्यांगावरि प्रीती करतां
तरि ती प्रीती जाइल यौवनबहर संपुनी जातां ५
हृदयभावनेवरि जी प्रीती अढळ प्रीती तीच
म्हणुनी सुंदर गालां, अधरा तुच्छ करीं मी साच ! ६

---

## २५.–स.

**चालः**–भला जन्म हा तुला०

सत्प्रेमानें त्वां वदलेल्या सुंदर वचनाप्रत
सेवुनी झालों मी हर्षित
प्रदोषकाळीं प्रसन्नहृदयें फिरतांना मागुती
तरल बहु झाली माझी मति !
हीन दीन मी, परी स्मृती मम वागविसी अंतरीं
स्मरुनि हें धालों मी कितितरी !
तैं मूकभावना हृदयीं बहु दाटल्या—या
चहुंकडे स्वैर त्या हेलावूं लागल्या
नवल तयाचें रूप बदलुनी प्रेमाश्रू जाहले
वहाया नयनांतुनि लागले ! १
ह्याच जलानें एक तरू मी आनंदें शिंपतों
वाटतें देइल सुफलास तो.

आस-वसंतें बहर येउनी पुष्पित तो होतसे
किति तरी नयनमनोहर दिसे !
नित्यविकासी फुलें तयाचीं मनास देती सुखा
त्यापुढें सुरतरु वाटे फिका !
तीं फुलें हुंगुनी धरितों मी उरिंशिरीं—ग
त्यांतील उधळितों किति तरि जनतेवरी
अरसिकही त्या पुष्पां हुंगुनि जाती मनिं गुंगुनी
योग्यच सतार डुलवी फणी ! २
विसरिन नच तीं त्वां दिधलेलीं निशिगंधाचीं फुलें
जयांनीं मन्मानस मोहिलें
तशींच दुसरीं किंचिन्मुकुलित गुलाबसुमनें मुदें
अर्पिलीं होत तींहि सौख्यदें.
त्या पुष्पांनीं जादू केली अहह ! मजवरी किती
क्षणीं मम झाली मूढा मती !
तीं फुलें निमालीं, दिनही गेला लया—ग
जाउंदे सुखें ही कविताही मम लया
परि चिर सखि ! तव स्मृति राहियली माझ्या हृदयांतरीं
नच तीं पुसेल, समजें कधीं ! ३

## श्रीयुत बापूराव रामचंद्र पडळकर, बी. ए. कृत.

### १ दयिता रुसली, कविता मुकली, असेल कां कारण याचें ?

**चाल**–फटक्याची

शून्य भासतें जग सारें हें, ओझें मज बहु जगण्याचें
दयिता रुसली, कविता मुकली, असेल कां कारण याचें ? ॥ध्रु० ॥
वसंत फुलवी बाग; पसरवी सुगंध कां हा चहूंकडे
आनंदानें रमति जोडपीं इथेंच माझ्या दृष्टिपुढें ?
का मज हतभाग्याला हें–
सुख ऐसें कधिं तरि लाहे ?
वेडाविति म्हणुनी मज हे
चरित्र ऐसें हीनसत्व बहु माझें मजला हें जाचें !
दयिता रुसली, कविता मुकली, असेल कां कारण याचें ? १
म्हणुनि वाटतें जग सारें हें वाळवंट कां नच झालें ?
उष्ण-वायुनें मनुज–देह ज्यांमधिं सारे पोळुनि गेले
झुडुप न नांवा ज्यांत दिसे
खरें जल न कोठें गवसे
मृग–जल सर्वत्रचि भासे
तृषा, भूक, उन, थंडी यांनीं स्मरण न जेथें सौख्याचें
दयिता रुसली, कविता मुकली, असेल कां कारण याचें ? २
निरभ्र कां हें नभ ? चमके कां तारासह तो रुचिर शशी ?
तया व्यापिती ढग काळे नच, कां न कडाडे वीज तशी ?
उसळुनि कां धुळिचे लोट
तिमिर न पसरे घनदाट–?
जेणें न दिसावी वाट

जगत्प्रलय तो आज घडावा वाटे मज ऐसें साचें
दयिता रुसली, कविता मुकली, असेल कां कारण याचें ? ३
हांसेना जरि केल्या बहु गुदगुल्या प्रियेच्या शरिरास
स्फूर्तिस दिधल्या किती चालना ! प्रसाद नच ये कवितेस
'व्यर्थी अधिकचि अर्थ असे'
तत्त्व न मजला हें गवसे
व्यर्थताच अर्थी भासे
कविरायाचे बोल असे कां फोल ठायिं मम व्हायाचे
दयिता रुसली, कविता मुकली, असेल कां कारण याचें ? ४
अफाट या जगहाटाचा मज कलकलाट नच मुळीं रुचे
म्हणुनी जातों एकान्तीं, परि तिथेंहि कांहीं मज न सुचे
ती प्रीतीची, ही प्रतिभेची दात्री असतां काय उणें ?
लाभे ज्यां ही जोड दिव्य त्या भासावें जग कसें सुनें ?
हंसतां प्रेमें निज कांता
कविता डुलवी जें चित्ता
स्वर्गचि येई तें हातां
श्वांस पारखा त्याच्या नशिबीं जिणें ठेविलें नरकाचें
दयिता रुसली, कविता मुकली, असेल कां कारण याचें ? ५

---

## २ मूर्तिमंत सौंदर्य !

My love in her attire doth shew her wit

**पृथ्वी वृत्त.**

प्रिया नटुनि शोभते मम कितीतरी ही पहा
गमे कुशलता स्वकीय जणुं दाविते कीं महा
जसा ऋतु नवा धरेस बहु देइ शोभा नव
नव्या वसन-भूषणां प्रति-दिनीं तशी लेवुन-

मनोज्ञ दिसते बहू विनयशील ती कामिनी
उणें न दिसतें कुठें स्वरुप तें तिचें देखुनी
स्वयेंचि नयनांपुढें सकल येइ सौंदर्य तें
यदा वसनहीन ती नचहि भूषणें सेविते !!

---

## ३ मुरलीची विश्रांति !!

चालः-त्यजि भक्तांसाठीं लाज.

हो मुरली तूं विश्रांत, बहु विषण्ण मन्मन झालें !
जे हरिति देहभानाला । ध्वनि मंजुल तव कर्णाला–
बहु कठोर गमती मजला–
कोमलत्व सर्वहि गेलें ॥ १ ॥

आलाप तुझ्यावर घेतां– । वाटतो खेद मम चित्ता
मम सखी रुग्ण ती असतां–
तुज खेळ कसे हे रुचले ? ॥ २ ॥

तुजसवें असें जें गात– । तारका नृत्य तें करित
शशि-मुखीं हास्यही स्फुरत
प्रेमानें सृष्टी डोले ॥ ३ ॥

तुम्हि मग्न अशा सुखडोहीं– । विसरुनी सखीला पाही
संत्रस्त होउनी राही–
जी शयनीं असुखीं लोळे ॥ ४ ॥

जें सखीस मम अवडेना । मन्मनास तें येईना
तुजवरी कशा मग ताना–
मी घेउं गोड त्या ? बोले ॥ ५ ॥

मज परी आपुल्या चित्तीं । प्रभुलागिं करीं तूं विनती

होऊं दे स्वस्थ सखी ती–
प्रभु-कृपें थोडक्या काळें ॥ ६ ॥
प्रेमें तुज घेउनि हातीं । दे हंसुनि सखी जैं मज ती
होईल मोद तैं चित्तीं
गाईन सुखें त्या वेळे ॥ ७ ॥

---

## ४ शांति.

मानस गेलें थकुनी लोकीं
स्वस्थता न चिर लाभे त्या कीं
म्हणुनि चहुंकडे शांति विलोकीं
परि न आढळे, कुठें नाकळे, कां निज मुख झांकी ?
असेल ती जनशून्य अरण्यीं ?
दरीमधें कां बसली रुसुनी ?
काढायास्तव तिजला शोधुनि–
आशेनें बहु निघें; परी ये सिंहरवचि कानीं !
असेल मग का रम्य उपवनीं ?
फुलें फेंकिती गंध-मोहिनी–
शांति-समाधिंत जिथें गुंगुनी.
क्षणीं भ्रमर हा नव कलिका परि टाकी चुरडोनी !
असेल खचिताचि त्या गगनांत
तारा जेथें चकमकतात–
पूर्ण शांतिचा अनुभव घेत
म्हणुनि लाविली वरी नजर तों झाला उल्कापात !
नाहीं येथें, नाहीं गगनीं
गवसेना, हो खिन्न स्वमनीं

तोंच लागुनी कोणीं कानीं–
वदे मधुरसें हळूच 'बघ, निज हृदयीं निरखोनी'
अंतर्मुख तैं दृष्टी झाली !
बाह्य उपाधी सर्व विसरली ! !
वृत्तिमधें मग वृत्ति मिसळली ! ! !
तोंच गोजिरी सान शांतिची मूर्ती मज दिसली !
प्रसाद हो मग सहजचि तीचा
थाट वर्णु किति त्या सौख्याचा ?
वर्णन म्हणजे मुकीच वाचा
हृदया पटणें, तन्मय होणें अनुभव हा त्याचा !
शांतिसवें तैं गोड बोलणीं–
केलीं मीं जीं लागुनि कानीं
तींच जाहलीं मम मधु गाणीं
गाउनि, ऐकुनि तींच जाति जन दुःखा विसरोनी !
मोक्ष, समाधी, स्वर्गवास हीं
नांवें या स्थितिलागीं पाहीं
ईश्वर म्हणजे शांती चिर ही
ज्यांचीं केलीं गूढ रहस्यें दांभिक लोक
तन्मयतेमधुनी त्या सुचिर
आलों क्षणभर जैं भानावर
कलकलाट चालला सभोंवर
दादचि नव्हती ज्याची मजला शांतिंत अनिवार !

---

## ५ काळाचे खेळ ! !

**पृथ्वी** (यमकरहित.)

मृगेंद्र करि गर्जना निजगुहांतरीं घोर ती
पशू अखिल ज्या भयें थरथरां किती कांपती !

REFBK-0001701
REFBK-0001701

तयाहि भय दावितो अतुल भूमि—कंप—ध्वनि !
तयाहि उदरांत घे कुटिल काल सर्वंकष ! ! १

*            *            *

फणा उभवुनी बळें करित घोर फूत्कार जो
क्षणीं मरण आणवी करुनि तीव्र दंशा निज
यदा नशिब पालटे, तनुवरी तदा कात ये
बने गतिहि मंद ती नयनकार्य जाई लया
कुणीहि नर घेउनी, करित दण्ड आघात त्या !
तदा मरण पावतो, त्यजुनि दर्प नागेंद्र तो ! ! ! २

*            *            *

सरित्तटनिवास जो तरु विशाल होई बहू
जया बहर येउनी, सुमन—गुच्छ ये सुंदर—
फलीं गजबजे तदा, पथिक—मानसा शांतिला—
बहू वितरि— सौख्य दे अखिल जीवजंतूंस तो
परी बहुत पूर ये, उमळुनी पडे तो तदा ! !
असा अदय काळ तो नच विवेक त्यातें लव ३

*            *            *

तशा धरुनि मानसीं बहुत नव्य त्या भावना
परोपरिच्च जो झटे दृढ बळें जना तारण्या
जनांस बहु आवडे, बहुत पूज्य ज्या मानिती
जगा दिपवि कीर्तिनें, अतुल बुद्धिसामर्थ्य ज्या
तनू निजहि वाहुनी सतत लोककार्या करी
तयांत सुख मानतो, बहुत कष्टही सोसुनी
अशाहि नर-दैवता छळुनि काळ टाकी मुखीं
शरीरधर कोणही सुटत त्या न दाढेंतुनी ४

*            *            *

जिथें अखिल भावना जडुनि राहिल्या, प्रेमही

जिच्या प्रणय-शक्तिनें असुख-सागरां लंघिलें
जिच्या मधुर भाषणें बहुत धीर येई मना
जिनें हंसुनि पाहिल्या बहुत होय उत्तेजित
जिच्या बहुत पावनें मन पवित्र हो वृत्तिनें
समागम जिचा करी सुरगृहें उणीं सौख्यद
जरी कितिहि ये मनीं बहुत वीट या सृष्टिचा
जिला बघुनि वाटते हिजमुळें जगावें जगीं
गमे हृदय-देवता तिजाशि पूजि भक्तीबळें
जिला हृदय-पाश-बंधन-बळें दृढाकर्षुनी-
समत्वहि जिच्यासवें सतत पावतो पूर्ण तो
जिच्याविण गमे जगत् अखिल शून्य ती कामिनी-
जरी अदय काळ तो उचलुनी बळें ने दुरी
तरी रसिकता खरोखर बहू तयाची दिसे ! !

*　　　*　　　*

फुलून सम साजिरें बहुत मोद देतें जनां
यदा अनिल वाहतो, हलत डोलतें जें मुदें
परार्थ जनिं घे-सुखा वितरि, कष्ट कोणां न दे
कठोर जन तोडुनी चुरडुनी तया टाकितो ! ।
मुलेंहि घरिं त्यापरी हंसुनि बोबडें बोलुनी
मना वितरिती प्रमोद बहु खेळुनी सर्वदा
यदा उचलुनी तया बहुत घे मुदें चुंबन
तदाच सुरलोकिंचें सुखहि निर्विकारी कळे
अशाहि जर बाळकां हरुनि नेइ-निर्दोष जें
गमे मज विवेक-शून्य बहु काल तो दांडगा ! ! ६

समाप्त.